# प्रसिद्धीकरीता

## ७५ वा प्रजासत्ताक दिन आणि उद्यानाचा वर्धापन दिनानिमित्त बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानात विविध स्पर्धांचे आयोजन

२६ जानेवारी गणतंत्र दिनाच्या औचित्याने गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानात वेशभूषा स्पर्धा व रील मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. वेशभूषा स्पर्धेकरिता ३ ते १० वर्षे वयोगटातील स्पर्धकांना भाग घेता येईल. सहभागींना **'भारतीय स्वातंत्र्य लढयातील सेनानी'** (स्वातंत्र्यसैनिक) वेशभूषा करून, वेश धारण केलेल्या व्यक्तिमत्त्वाबद्दल ३० सेकंद ते १ मिनिट बोलणे अपेक्षित आहे. याबरोबरच वने आणि पर्यावरणाच्या रक्षणाबाबत संदेश चांगल्या प्रकारे प्रेक्षकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १० ते ११.३० या वेळेत स्पर्धा घेण्यात येईल. स्पर्धेकरिता पूर्वनोंदणी स्पर्धेच्या दिवशी सकाळी ८.३० वाजता पासून करण्यात येईल. या स्पर्धेकरिता कोणतेही प्रवेश शुल्क नाही. वेशभूषा स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय सोबतच दोन उत्तेजनार्थ पारितोषिके दिले जातील, सोबतच प्रत्येक स्पर्धकाला प्रमाणपत्र मिळेल. वेशभूषा स्पर्धेचे बक्षीस वितरण दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी दुपारी १२ वाजता करण्यात येईल.

यासोबतच बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाच्या वर्धापन दिनानिमित्त 'रील' मेकिंग स्पर्धेचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे. चित्रफीत ही गोरेवाडा प्राणिसंग्रहालय आधारित असावी. या स्पर्धेसाठी २६ जानेवारी ते ११ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत स्पर्धकांना आपली चित्रफीत Instagram/Facebook/Youtube या समाजमाध्यमांवर गोरेवाडयाच्या अधिकृत अकाऊंटला टॅग किंवा कोलॅबरेट करावयाचे आहे. या स्पर्धेत एकूण रू. २ लक्ष किमतीची बक्षीसे देण्यात येतील. जी चित्रफीत जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहचेल त्या स्पर्धकास रू. ५०,०००/— रोख चे प्रथम पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येईल. अधिक माहितीसाठी उद्यानाचे अधिकृत संकेतस्थळ www.wildgorewada.com अथवा फेसबुक, इन्स्टाग्राम, युटयुब वरील wildgorewada page भेट दयावी. या स्पर्धेतील विजेत्यांना वन विकास महामंडळाच्या वर्धापन दिनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४ रोजी बक्षिस वितरण करण्यात येईल. चित्रफीत ही कमीत कमी १५ ते ९० सेकंदाची असावी. जास्तीत जास्त इच्छुकांनी या रील मेकिंग स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानामार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी कृपया श्री. रोशन पडोळे, zoogorewada@gmail.com मो. नं. 9890544466, 7507603236 यांच्याशी संपर्क करावा.

(एस. एस. भागवत)
**विभागीय व्यवस्थापक,**
गोरेवाडा प्रकल्प, नागपूर तथा
**प्राणीसंग्रहालय संचालक,**
बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय
प्राणि उद्यान, नागपूर